# राष्ट्रसंतांच्या विचारातील सामाजिक व वैज्ञानिक दृष्टी :

**डॉ. रवींद्र मुरमाडे**
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम,चंद्रपूर
Email ID: murmaderu06@gmail.com
Mob. 7620526834

---

***सारांश :***

*वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकातील थोर संत म्हणून ओळखले जातात. राष्ट्रसंतांचे निधन झाले त्यावेळी आचार्य अत्रे यांनी वर्तमान पत्रात लिहिलेले शीर्षक अत्यंत मार्मीक व विचार प्रवणीय होते. ''महाभारतातील महानायकाचे महानिर्वाण'' या शिर्षकावरून राष्ट्रसंतांची देशातील लोकप्रियता व राष्ट्रासंतांकडे पाहण्याचा दृष्टीकोन आपल्या लक्षात येतो. ज्या ज्या वेळी समाजाचे अध:पतन होते त्या त्या वेळी एखादा महापुरुष अवतरत असतो. नेमके राष्ट्रसंतांच्या बाबतीत हेच घडले.*

*एकेकाळी देशाचा पोशिंदा म्हणविला जाणारा शेतकरी वर्ग पूर्णतः दारिद्र्यात पिचल्या जात होता. पिळल्या जात होता. जे जे काही जीवनात घडत आहे. ते केवळ नशिबाचा भाग आहे. अशी त्यांची ठाम समजूत झालेली होती.*

*अशा शेतकऱ्यांमध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी सामर्थ्यांचे रणशिंग फुंकले व त्याच्या ह्या अवनत स्थितीची कारणे शोधून त्याला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणारा म. जोतीराव फुले हे शे तकऱ्यांच्या स्थिती विषयी भाष्य करणारे देशातील पहिले होते. त्यानंतर महात्मा गांधी यांनी राजकारणाच्या निमित्ताने खेड्यामध्ये 'ग्रामस्वराज्य' ही संकल्पना रुजविली. तोच धागा घेऊन महात्मा गांधींच्या निधनानंतर ३८ वर्षांचे असणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी खेड्यातील लोकांकरिता ग्रामगीतेच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व वैज्ञानिक दृष्टी देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ग्रामनिर्माणातून देशोन्नती हे राष्ट्रसंतांच्या विचारांचे मुख्य सूत्र आणि जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट होते. गावातील ग्रामनाथ जो अज्ञानी, दरिद्री, आळशी आहे तो या विचारसूत्राच्या केंद्रस्थानी आहे.*

***बीजसंज्ञा :***

*अज्ञान, अंधविश्वास, ग्रामोन्नती, आत्मनिर्भरता, संपन्नता, स्वाभिमान व वैज्ञानिकता.*

---

**प्रस्तावना :**

राष्ट्रसंतांनी मानवी मुक्तीचा मार्ग शोधताना आध्यात्मिक लोकशाहीचाही विचार मांडला. समाजाला रुढीच्या कठोर बंधनातून, जातीपातीच्या मगरमिठीतून आणि धर्मग्रंथातील अंधश्रधांच्या जाळ्यातून सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. म्हणूनच ज्ञानदेव – नामदेव यांनी सुरु केलेल्या भक्ती आंदोलनाचे कळस झालेले तुकाराम "नवसे कन्यापूत्र होती मग का करणे लागे पती"? असा रोखठोक सवाल करताना दिसतात. 'मंदिरी बैसोनी नाक दाबावे व त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे' किंवा 'एक हात खोदावी जमीन हे पुजनाहुनी पूजन' म्हणणारे राष्ट्रसंत तुकारामाप्रमाणेच अंधश्रद्धा, कर्मकांडावर, धर्मभोळेपणावर आणि दांभिकतेवर प्रहर केले. रोखठोकपणा नसला तरी अज्ञान अंधश्रधेवर प्रहार करताना पूजा, भक्ती, प्रार्थना, नामस्मरण व ध्यान यांच्या नव्या संकल्पना राष्ट्रसंत मांडतात.

Research Hub International Journal

समाजक्रांतीचा व परिवर्तनाचा संपूर्ण वैज्ञानिक विचार मांडताना परलोक, पुनर्जन्म, स्वर्ग, मोक्ष, कर्मविपाक सिद्धांत यावर परखड भाष्य करतात.

या देशात चातुर्वर्ण्यावर आधारलेली आणि जाती उपजातीनी विभाजित झालेली भारतीय समाजरचना ही केवळ विषमतेचे पोषण करणारी आहे असे नाही तर येथील साऱ्या समस्याचे मूळ आहे. आणि म्हणूनच ती अन्याय मूलक आहे. उचनीचता आणि स्पृश्यास्पृश्यता ही या समाजाची जणू आधारशीलाच आहे. ती निपटून काढण्यासाठी राष्ट्रासंतानी ग्रामगीतेतून सामाजिक व वैज्ञानिक विचार या देशातील ग्रामस्थांना देतात.

**आदर्श ग्रामोन्नतीचा पुरस्कार :**

कोणत्याही शतकातील महापुरुषांचा विचार हा संपूर्ण समाजाच्या स्थितीशीलतेचा कणा मोडून त्या समाजाला गतीशीलतेकडे घेऊन जाणारा असतो. तो आत्मनिर्भरतेकडे, संपन्नतेकडे नेणारा असतो. आजही भारतात सहा लाख खेड्यामध्ये ६५ टक्के लोक राहतात. त्यांचा उदरनिर्वाह शेतीवर चालतो; खेड्यातील या शेतकऱ्यांचे आणि कष्टकऱ्याचे जीवन आजही हलाखीचे आहे. याची मीमांसा महात्मा ज्योतीराव फुलेंच्या व महात्मा गांधीजी नंतर वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केली. ग्रोमोद्धाराचा विचार हा अगदी स्वंतत्र आहे. राष्ट्रासंतानी स्त्री आणि शुद्राती शुद्र यांचा उत्थानाचा आणि समाजसुधारणेचा विचार त्यांनी नीट समजून घेतला होता. शिवाय गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची संकल्पना ही त्यांनी पुरेपूर आत्मसात केली होती. दोन्ही महापुरुषांच्या विचार आणि कार्याला आपल्या ग्रामगीतेत गौरवोद्गार काढताना ते लिहितात;

“लाख बोलक्याहुनी थोर माझा
एकच कर्तबगार
आणि
हे वचन पाळोनी सुंदर
गाव सुधारावे कार्याने”

अशी पुस्ती जोडत फुल्यांच्या कार्य सुधारकी बाण्याला कुर्निसात करत जणू आपलाही जीवन हेतू सांगून टाकतात. महात्मा गांधी यांच्या निधनानंतर 38 वर्षांचे असणारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वातंत्र्यपूर्व भारत अनुभवून स्वातंत्र्यासाठी मोजलेली किंमत पाहिली होती. अनुभवली होती. अतिशय लहान वयात संत पदावर पोहोचलेल्या राष्ट्रसंतांनी स्वातंत्र्यपूर्व वीस वर्ष ग्रामोन्नतीसाठी व समाज जागृतीसाठी आपली लेखणी घातली. म्हणूनच राष्ट्रसंतांची ग्रामगीता हा एक नित्य नूतन पूर्तीचा झरा आहे”१ हे डॉ. सुभाष सावरकर यांचे ग्रामगीतेविषयीचे विचार तंतोतंत खरे आहे.

**समाज प्रबोधनाची भूमिका :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे वर्तमान युगातील समाज प्रबोधनकार म्हणून ओळखले जातात. समाजामध्ये जे जे त्यांनी पाहिले,प्रत्यक्ष अनुभवले तेच समाजाला उदबोधन करताना दिसतात. काळानुसार समाजाचे मानसशास्त्र बदलत जाते म्हणून संत तुकारामाने ढोंगी लोकांवर सडकून टीका केली आणि ‘मोजूणी माराव्या पैजारा’ असेही सांगून टाकले राष्ट्रसंतांनी विसाव्या शतकात जीवन जगणाऱ्या माणसाची नाळी ओळखली आणि गरज पडेल तिथे त्यांनी समाजातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

अध्यात्म और विज्ञान से सब हो सुखी

सहयोग समता से यह सृष्टी बने स्वर्गही’ ही त्यांची धारणा होती. हीच त्यांची गुरुदेवाला प्रार्थना होती.

Research Hub International Journal

राष्ट्रसंतांनी जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करून सामाजिक अंगाने प्रबोधनाच्या भूमिकेतून ही पताका उंच उंच फडकवित नेताना दिसतात. त्यांचे समाज प्रबोधन हे विज्ञाननिष्ठ होते .अंधश्रद्धेवर त्यांनी अतिशय खनाघाती प्रहार केले. आपल्या शेकडो भजनांच्या माध्यमातून जनजागरण करून समाजात नवचेतना निर्माण केली. त्यांच्या भजनांनी तत्कालीन ग्रामीण समाज अक्षरशः भारावून गेला होता. ही राष्ट्रसंतांची समाज प्रबोधनाची हातोडी होती.

जनता हीच जनार्दन मानून ईश्वराला माणसात शोधण्याचा विलक्षण प्रयत्न राष्ट्रसंत ग्रामगीतेतून करतात. धर्मग्रंथ पुराणादी भाकड कथांमधून मांडलेल्या ईश्वरी संकल्पनेला राष्ट्रसंत छेद देतात व आपली स्वतंत्र भूमिका मांडतात. "ऐसे देवावरी विश्वासूंनी लोक झालेत दुबळे मनी" (ग्रामगीताओवी क्र. ८९ ) मानवी कर्तुत्व नाकारणारे ही संकल्पना राष्ट्रसंतांना मान्य नाही. उलट "जे जे पुरुष थोर झालेब I त्यांसी अवताराची संबोधले I ज्यांचे ज्यांना चरित्र पटले I त्यांनी मानले त्यालागी II ओवी क्र. ५० आपल्यातील असामान्य गुणांनी व कर्तुत्वांनी सामान्य माणूसही ईश्वर होऊ शकतो. येथील धर्मग्रंथांनी मानलेले अवतार हे प्रथम मानवच होते. त्यांच्यातील असामान्य कर्तुत्व आणि ते अवतार म्हणून ओळखले जाऊ लागले. तात्पर्य प्रत्येक मानवाने समाजाच्या उन्नतीकरिता प्रयत्नशील असले पाहिजे. ही शिकवण राष्ट्रसंतांची होती. 'कर्म हाच ईश्वर आहे' यावर राष्ट्रसंतांचा ठाम विश्वास होता. आणि या ठाम भूमिकेतून राष्ट्रसंतांनी समाज मनाला देवकार्यातून देशकार्याकडे वळविले आहे. खरी ईश्वरी उपासना समाज हितात्मक व राष्ट्रहितात्मक कार्य व कर्तव्यात आहे. ही भूमिका राष्ट्रसंतांनी समाज मनात प्रबोधनाच्या माध्यमातून रुजविली आहे.

राष्ट्रसंतांच्या कार्याविषयी डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य महत्वपूर्ण असून या व्यापक कार्याची अनेक दृष्टीने मीमांसा होणे आवश्यक आहे. समाजावर संस्कार करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारक सुधारकांत त्यांना अलीकडील काळात विशेष स्थान आहे."२ जातीभेद, धर्मभेद व लिंगभेद अशा प्रचलित भेदामुळे मानवतेला सुरुंग लावणाऱ्या अमानुष्य, अन्यायाची रूढी प्रथांचे उच्चाटन करून स्वतंत्रता, एकात्मता, समानता आणि बंधुता या मुख्य तत्वावर मानवी समाजाचे पुनरुज्जीवन व्हावे, सर्वअंगी विश्वबंधुत्वाची धारणा विकसित व्हावी यासाठी राष्ट्रासंतानी आपल्या भजनामधून समाजोपदेश करण्याचा प्रयत्न केला.

**वैज्ञानिकता :**

राष्ट्रसंतांचा वैज्ञानिक विचार हा व्यापक मानवी जीवनदृष्टीतून आणि मानवी कल्याणाच्या विचारांतून पदोपदी प्रकटताना दिसतो. त्यांचे समाजप्रबोधन हे विज्ञाननिष्ठ होते. गोरक्षणाचा विषय हाताळताना त्यांनी गोहत्या मुळे या देशाची आर्थिक हानी कशी होणार आहे हे पटवून सांगितले होते. 'सर्वथैव यंत्रांनी काही शेती सुखकर होणार नाही' असा इशारा त्यांनी भारतीय शेतकऱ्यांना दिला होता. सर्व रोजगाराचे मूळ हे अस्वच्छतेत आहे; ही वैज्ञानिक दृष्टी राष्ट्रसंतांनी आपल्याला दिली.

"केले मंगळावरील उड्डाण I
चढला हिमगिरी शिखरी पूर्ण I
शोधिले अग्नी अस्त्र,अणू अस्त्र महान I
हैड्रोजनादी I
ऐकती करोडो मैलांवरून I
परस्परांचे गायन - भाषण I

विश्व हे आटोक्यात आणून I

घर केले राहण्याचे I”

हे सारे विज्ञानाने घडवून आणले आहे. म्हणून भारतीयांनी विज्ञानाची कास धरली पाहिजे असे ते म्हणत.

“सच काम किया जिसने जग मे

उसने प्रभू नाम लिया न लिया “

अशा स्पष्ट शब्दांत खऱ्या कर्तुत्वालाच राष्ट्रसंत प्राधान्य देतात. शब्द प्रामान्य वादाला फाटा देऊन खऱ्या भक्तीचा मार्ग सतआचारात असल्याचा मौलिक संदेश ते देतात.

“कशाला पंढरी जातो रे बाबा” म्हणत आपल्याच गावात पंढरी आहे म्हणणाऱ्या आणि “देव बाजारचा भाजीपाला नाही रे” असे परखडपणे सुनावणाऱ्या राष्ट्रसंतांचे विचार वर्तमानात लक्षात घेताना प्रामुख्याने त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टी आपल्या लक्षात येते. वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्यात्माचा आणि धर्माचरणाचा त्यांनी सांगितलेला मार्ग अंधश्रद्धा निर्मूलनाला पोषक आहे. अंधश्रद्धेच्या विरोधातील राष्ट्रसंतांचे कार्य अनन्यसाधारण असे आहे. यातून त्यांच्या मध्ये असणाऱ्या वैज्ञानिक दृष्टीचा प्रत्यय येतो.

**समारोप :**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता ही खरंतर वर्तमान काळात समाज जीवनासाठी महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे ग्रामीण जीवनाविषयीची कणव असल्यामुळे त्यांनी ही ग्रामगीता ग्रामनाभाला समर्पित केली. जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन त्यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारून समाजासमोर एक आदर्श वस्तूपाठ निर्माण केला. ही वैश्विक दृष्टी त्यांना लाभली.

**निष्कर्ष :**

१) संपूर्ण समाजाला समानतेच्या एका धाग्यात आणण्याचं महत्त्वपूर्ण कार्य ग्रामगीतेने केले.

२) अंधश्रद्धा व धर्मभोळेपणा यांना मुठमाती दिली.

३) ग्रामगीतेतून समाजाला वैज्ञानिक दृष्टी दिली.

४) मानवीमूल्ये रुजविणारे द्रष्टे संत म्हणून ओळख निर्माण केली.

**संदर्भ :**


- सावरकर सुभाष : साहित्य इतिहासातले हरवलेले पान लेखातून अक्षर वैदर्भी फेब्रु. १९९२
- पदवाळ बाळ : राष्ट्रासंत वैचारिक क्रांती
- लोकराज्य : नोव्हेंबर – २०००
- राष्ट्रसंतांचे पाईक : प्राचार्य एन. एन. कोकोडे गौरव ग्रंथ जुलै २०२२ .


Research Hub International Journal